# आधुनिकोत्तर साम्राज्यवादाचा ताजा आविष्कार

**चंद्रशेखर पुरंदरे**

२८ फेब्रुवारीला युक्रेन या स्वतंत्र देशाच्या क्रायमिया(Crimea) या राज्यात रशियाने आपले सैन्य धाडले व त्या राज्याची राजधानी, दुसरे महत्त्वाचे शहर, लष्करी तळ इत्यादी ताब्यात घेतले. हे सैन्य 'साध्या' गणवेशात होते. म्हणजे कोणत्याही विशिष्ट देशाचे ओळखचिन्ह त्यावर नव्हते. पण सैनिकांच्या मुलाखतींनुसार ते रशियन सैन्यच होते. तरीही रशियन राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या मते ते रशियाधार्जिणे युक्रेनियन्सच होते. ('असे गणवेश कोणत्याही दुकानात स्वस्तात मिळतात!') पुढच्या आठवड्याभरातच संपूर्ण राज्य रशियाच्या नियंत्रणाखाली आले. १८ मार्चला पुतीनने संसदेत क्रायमिया रक्ताचा एक थेंबही न सांडता रशियात विलीन झाल्याची घोषणा केली व तशा अधिकृत करारावर क्राममियाच्या प्रतिनिधींबरोबर सह्याही केल्या.

एका सार्वभौम देशावरचे रशियाचे हे आक्रमण आहे असा आरोप युक्रेन व अमेरिका-फ्रान्स-जर्मनी-ब्रिटन वगैरे पाश्चात्त्य देशांनी २८ फेब्रुवारीपासूनच सुरू केला व या अवैध कारवाईचे गंभीर परिणाम होतील असे इशारे रशियाला देण्यात आले. रशियाने क्रायमियामधून त्वरित काढता पाय घ्यावा अशी मागणीही सुरू केली. संयुक्त राष्ट्रसंघानेही या कारवाईचा निषेध केला.

हे वादळ एवढ्यात शमेल असे दिसत नाही. आक्रमक देश आणि त्याचा बळी असे समीकरण पश्चिम मांडते आहे, तितके ते सरळ नाही. एखाद्या देशाचे सार्वभौमत्व; देशाच्या सीमापार जाणारे ऐतिहासिक-वांशिक संबंध (भारतीय तमिळ व श्रीलंकन तमिळ); एखाद्या देशातून विभक्त होण्याचा, स्वतंत्र होण्याचा किंवा दुसऱ्या देशात विलीन होण्याचा एखाद्या प्रांताचा अधिकार व लोकशाहीत अपरिहार्य असणारा साळसूद व वैध अन्याय असे बरेच पदर या घटनेला आहेत.

युक्रेनच्या पूर्वेला रशिया व पश्चिमेला युरोप आहे. युक्रेनची लोकसंख्या साडेचार कोटी व क्रायमियाची वीस लाखाच्या आसपास आहे. क्रायमियातील ६०% लोक रशियन भाषिक व रशियन वंशाचे आहेत. २५% युक्रेनियन्स आहेत तर १२% तातर मुस्लिम आहेत. अनेक रशियन-युक्रेनियन्समध्ये अंतर्विवाह होतात. बहुतेक देशात युक्रेनियन व रशियन दोन्ही भाषा बोलल्या जातात. क्रायमिया युक्रेनमधला दक्षिणेचा प्रांत आहे. त्याच्याचबरोबर पूर्व युक्रेनमध्येही रशियनधार्जिण्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. या दोन्ही भागात अवजड उद्योग आहेत व या लोकसंख्येचा कल ऐतिहासिकदृष्ट्या युक्रेनपेक्षा रशियाकडे राहिलेला आहे. तर युक्रेनियन्स व तातर मुस्लिम रशियाविरोधी आहेत.

युक्रेन १९९२ पर्यंत सोव्हिएत युनियनचा भाग होता. मग सोविएत युनियनचे विघटन झाले व तो स्वतंत्र देश झाला. त्याआधी, १९५४ पर्यंत सोव्हिएत युनियनअंतर्गत युक्रेन व क्रायमिया ही निराळी राज्ये होती. १९५४ ला तेव्हाचा रशियन अध्यक्ष निकिता ख्रुश्चेव याने क्रायमिया युक्रेनला 'बहाल' केला. तेव्हापासून क्रायमिया युक्रेनचा एक भाग झाला आणि विघटनानंतर तोही रशियापासून विभक्त होऊन युक्रेन या स्वतंत्र देशाचा एक प्रांत झाला. पुतीनच्या मते क्रायमिया युक्रेनला देण्याची ऐतिहासिक चूक या कारवाईने दुरूस्त झाली. अर्थात ही कारवाई ही तुटक स्वतंत्र घटना नाही. त्यामागे अनेक दीर्घकालीन आर्थिक, मानसिक व सांस्कृतिक प्रक्रिया आहेत.

एकतर सोव्हिएत युनियनचे विघटन पुतीनच्या पिढीच्या रशियनांनी मनोमन स्वीकारलेले नाही. या विघटनानंतरचे अमेरिकाकेंद्रित एकध्रुवीय जगही त्यांना अमान्य राहिले. रशियाच्या जागतिक मानहानीची एकही संधी अमेरिका व पश्चिम सोडत नाहीत हा ग्रह तेव्हापासून दृढ होत राहिला आहे. North Atlantic Treaty Organisation (NATO) ही अमेरिका व पाश्चात्त्य राष्ट्रे यांची लष्करी संघटना आहे. त्याबरोबरच युरोपियन युनियन(EU) ही फ्रान्स-जर्मनी वगैरे प्रामुख्याने पश्चिम युरोपियन व आता पश्चिम व आधीच्या रशियन प्रभावक्षेत्राखाली असलेल्या पूर्व युरोपियन देशांची व्यापारी संघटना आहे. NATO व EU रशियाला शह देण्यासाठी कार्यरत आहेत असा रशियाचा समज आहे. युक्रेनपुरते बोलायचे झाल्यास युक्रेन या संघटनांमध्ये आल्यास त्यांची सीमा रशियापर्यंत येऊन भिडेल. भांडवलशाही, मुक्त बाजार, लोकशाही या विचारप्रणालीचा विस्तार या दृष्टीने पश्चिम या संघटनांच्या विस्ताराकडे पाहते, तर स्वैराचारी समाजाचे अतिक्रमण आणि सुरक्षेचा प्रश्न या दृष्टीने रशिया या विस्ताराकडे पाहतो. त्यात सोव्हिएत युनियनमधून फुटून निघाल्यावर युक्रेनमध्ये राजकीय स्थैर्य राहिलेले नाही. वर उल्लेख केलेले तीन प्रमुख वांशिक गटांमधील अंतर व भौगोलिक मतभिन्नता वाढत आहे. पूर्व व दक्षिण युक्रेन रशियाला तर उरलेला युक्रेन पश्चिम युरोपला सहानुभूत राहिलेला आहे. रशियाला सहानुभूत युक्रेनला (त्यात क्रायमियाही आला) सोव्हिएत युनियनसारखे सामाजिक स्थैर्य हवेसे वाटते

तर उर्वरित युक्रेनियन्सना युरोपियन देशांची भुरळ आहे. EU त समावेश झाल्यास जादूची कांडी फिरेल, कमालीचे भ्रष्टाचारी राज्यकर्ते दूर होतील व युरोपमधील समृद्धी आपल्याला लाभेल ही ती भुरळ आहे. दिवाळखोरीच्या सरकारी कारभाराने चिरडीला येऊन उर्वरित युक्रेनची जनता गेले काही महिने कीव (Kiev) या युक्रेनच्या राजधानीत रस्त्यावर तीव्र निदर्शने करत आहे. त्या दडपणाखाली राजवटीने EUशी चर्चा सुरू केली. ही चर्चा प्रामुख्याने EUने आर्थिक मदत द्यावी यासाठी होती. युक्रेन पैशासाठी EUकडे झुकत आहे हे पाहिल्यावर रशियाने रातोरात १५ बिलियन डॉलर्सचा कर्जपुरवठा मंजूर केला व राजवटीने EUकडे पाठ फिरवली. त्याच्या निषेधार्थ लोक परत रस्त्यावर आले. या लोकांना पश्चिम युरोपमधील व्यक्तिस्वातंत्र्य, समृद्धी जसे दिसते तसेच रशियातील भ्रष्टाचार, व्यक्तिस्वातंत्र्यावरील निर्बंध व निम्न जीवनमानही दिसते. हे निषेध पोलिसी दमनशाहीने दडपण्याचा राजवटीने प्रयत्न केला. त्यात ७०-८० निदर्शकांना जानेवारी-फेब्रुवारीत ठारही मारले. पण असंतोष वाढत गेल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली. आपण आता लोकांच्या हाती लागलो तर मध्यपूर्वेतील हुकूमशहांसारखी, अगदी लिबियाचा हुकूमशहा कर्नल गदाफी याला लोकांनी रस्त्यावर ठार मारले, वेळ येईल हे लक्षात येऊन राष्ट्राध्यक्षाने रशियाला पळ काढला.

मग हे निदर्शक फॅसिस्ट आहेत, नव-नाझी आहेत, ते पश्चिमेने फूस देऊन उभे केलेले आहेत, त्यांनी निर्वाचित सरकार पाडले तर त्यांना लोकशाहीची काय पर्वा असणार इत्यादी प्रचार रशियाने सुरू केला. तेथील रशियनांची संभाव्य जीवित-वित्तहानी या फॅसिस्ट लोकांपासून वाचवण्याचा उद्देश जाहीर केला. दरम्यान कीवमध्ये एक काळजीवाहू युक्रेनियन सरकार आले. त्याने लगेचच आपल्याच पायावर धोंडा मारून घेतला. आजवर युक्रेनमध्ये दुसरी अधिकृत भाषा म्हणून रशियन भाषेला मान्यता होती, ती त्यांनी रद्द केली. त्यामुळे युक्रेनच्या केंद्र सरकारबद्दल आधीच फारशी आपुलकी नसणारा पूर्व व दक्षिण युक्रेन (म्हणजे क्रायमिया) दुखावले गेले आणि रशियाचा हस्तक्षेप सुकर झाला. तेथील सरकारने मे महिन्यात घ्यायचे सार्वमत १६ मार्चलाच घेतले व त्यानुसार ९०% हून अधिक जनतेने रशियात सामील व्हायचा निर्णय दिला. हे सार्वमत अवैध असल्याचा दावा (अपेक्षेप्रमाणे) युक्रेनचे केंद्र सरकार व पश्चिमेने केला आहे. क्रायमियाजवळ रशियाचा मोठा लष्करी तळ आहे. तो सुरक्षित राखण्याचा उद्देशही या हस्तक्षेपाने रशियाने साधला, त्याचाही पश्चिमेला राग आहे.

**परिणाम**

आज युरोपमध्ये आयात होणाऱ्या गॅस या जीवनावश्यक इंधनातील २२ ते २५% गॅस रशियातून येतो. जर्मनीत तर ५०%. त्यामुळे रशियाविरुद्धची आर्थिक नियंत्रणे लादायला युरोपमध्ये एकमत होणार नाही हा पुतीनचा अंदाज आहे. युक्रेन तर जवळजवळ संपूर्णपणेच रशियावर गॅस पुरवठ्यासाठी अवलंबून आहे. त्यांची या खात्यावर जुनी थकबाकीही बरीच आहे. त्या वसुलीसाठी व भाववाढीसाठी रशियाने २००९ साली युक्रेनचा गॅस पुरवठाच काही काळासाठी बंद केला होता. परत, युरोपला पुरवला जाणारा गॅस युक्रेनमधून पाईपलाईन्सने जातो. हा तिढा अशा संघर्षाने अधिक क्लिष्ट होऊ शकतो. हे परस्परावलंबित्व कमी करण्यासाठी युक्रेन टाळून इतर देशांतून पाईपलाईन्स टाकण्याचा रशियाचा प्रयत्न आहे, तर गॅसच्या पुरवठ्यासाठी रशियाखेरीज इतर देश शोधण्याचा युक्रेनचा. अगदी अलीकडे नवीन तंत्रज्ञानामुळे अमेरिकेला गॅसचे प्रचंड अंतर्गत साठे मिळाले आहेत. हा गॅस युक्रेनसकट युरोपला निर्यात करून रशियावरचे त्यांचे अवलंबन कमी करणे ही एक दिशा आहे. शिवाय आज रशिया ठरवेल तो गॅसचा भाव भविष्यात कायम राहील असेही नाही. मग आजच डबघाईला आलेली रशियन अर्थव्यवस्था आणखीच नाजूक होऊ शकते.

१८६८ ला रशियाने चेकोस्लोवाकियावर आक्रमण केले तेव्हाची कम्युनिस्ट अर्थव्यवस्था उर्वरित जगापासून अलिप्त होती व जग रशियाला फारसा आर्थिक उपद्रव देऊ शकले नाही. आज ती परिस्थिती नाही. रशिया World Trade Organization चा सभासद आहे. अनेक मोठ्या रशियन कंपन्यांचे पाश्चात्त्य बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर व्यापारी संबंध आहेत. तीच गोष्ट बँकांची व अतिश्रीमंत रशियन उद्योजकांची. त्यामुळे या घटकांवर पश्चिमेने निर्बंध घालणे रशियाला महागात जाईल.

दुसऱ्या बाजूला पश्चिमेलाही रशियाची जरूरी आहे. सीरिया व इराण ही दोन उदाहरणे. सीरियातील यादवी तीन वर्षे चालू आहे. बशर असदच्या राजवटीने आजवर दोन लाखाहून अधिक निरपराधी नागरिकांची हत्या केली आहे. काहींना तर रासायनिक शस्त्रास्त्रांनी मारले आहे. अंतर्गत व देशाबाहेर जावे लागलेले निर्वासित पस्तीस लाखाच्या आसपास असावेत. पश्चिम या हत्याकांडात काही करू इच्छित नाही. अफगाणिस्तान, इराकमध्ये हात पोळल्यावर बाहेरच्या देशात अमेरिकन सैन्य पाठवायचे नाही हे ओबामा राजवटीचे धोरण राहिलेले आहे. तेव्हा सीरियाच्या असद राजवटीला वाटाघाटीला भाग पाडणे, रासायनिक शस्त्रास्त्रे नष्ट करायला लावणे हे दडपण फक्त रशियाच आणू शकला.

किंवा, इराकचा अणुप्रकल्प पश्चिमेला बंद पाडायचा आहे. तो अगदी बंद नाही तरी आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली ठेवायला इराणला भाग पाडणे रशियाच्या मध्यस्थीने शक्य झाले. नाहीतर गेली अनेक वर्षे पश्चिमेच्या आर्थिक निर्बंधांना इराण दाद देत नाही हे स्पष्ट झाले होते. पश्चिमेने दबाव टाकल्यास रशियाचा हा सहभाग कमी होण्याची दाट शक्यता आहे.

*(पान ३० वर)*

***जगभर*** *(पान ९ वरून)*

एकूण चित्र पाहता अमेरिकेच्या वर्चस्ववादाला आव्हान मिळाले आहे. लोकशाही मार्गाने देश दुभंगण्याची नैतिकता हे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोणतीच लोकशाही अल्पसंख्याकांची कदर करू शकत नाही हे क्रायमियातील युक्रेनियन्स व विशेषत: तातर मुस्लिमांच्याबाबत पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. वंशभेदाने युक्रेनचे आणखी विभाजन, मुस्लिमांच्या धर्मरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय इस्लामी मूलतत्त्ववाद्यांचा तेथे प्रवेश झाला तर होणारे अराजक व हिंसा रशियाच्या नियंत्रणाबाहेर जाण्याचीही शक्यता आहे.

श्रीकृष्णाने युद्धभूमीवर कर्णाला विचारले, 'तेव्हा तुझा धर्म कोठे गेला होता?' आज असाच पवित्रा पुतीनने पश्चिमेबाबत घेतला आहे आणि पश्चिमेचा दुटप्पीपणा उघड केला आहे. इतरांवर युद्धे लढण्याची, एकतर्फी व लोकशाहीविरोधी निर्णय घेण्याची पश्चिमेची संस्कृती विरुद्ध कोठेही असलेल्या रशियनांचा तारणहार अशी रशियाची प्रतिमा उभी करण्याचा हा प्रयत्न आहे. पण पश्चिम व रशिया दोघांतही या दिखाव्याच्या लोकशाहीचा साळसूदपणा हा समान घटक आहे.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*